# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं).०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे व्दारकामाईतील धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – ३,३००/- **बयाणा रक्कम** – ५५,०००/-

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी-शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.१४ / ०६ /२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.२० /०६ /२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु. ५५,०००/- (अक्षरी रु. पंचावन्न हजार) मात्र बयाणा रक्कम व निविदा फी रु. ३,३००/- (अक्षरी रु. तीन हजार तीनशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

४. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.२१/०६/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

६. कोणतीही निविदा अंशत: / पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**( दी.म. मुगळीकर, भा.प्र.से. )**<br>
**मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
## शिरडी ४२३ १०९.
## तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२, २५८७११/१३
फॅक्स क्रमांक +९१-२४२३-२५८८७०

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई- ४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६

# ऑगष्ट - २०१९ ते जुलै -२०२० या वर्षाकरीता
# रानशेणी गोवरी पुरविणेची ई-निविदा

४/ [illegible]

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**निविदाधारकांसाठी सूचना**

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदा फी रक्कम रु.३,३००/- (रु.तीन हजार तीनशे मात्र) व बयाणा रक्कम रु. ५५,०००/- (रू. पंचावन्न हजार) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

४. सदर निविदा दि.१४/०६/१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.२५/०६/१९ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

७. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

८. **सदर ई-निविदेतील गोवरीचे वर्णन व मागणी हे BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.** ई-निविदा भरतांना GST व इतर शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह दर नमूद करावेत.

९. सदर खरेदीची ई-निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**( दी.म. मुगळीकर, भा.प्र.से. )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. **पुरवठा करावयाचे गोवरीचे वर्णन व मागणी हे BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.**

२. **पुरवठा आदेश दिल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे गोवरीची मागणी संस्थानचे मंदिर विभागाकडून केली जाईल. त्याप्रमाणे पुरवठा आदेश दिल्यापासून १ वर्षाकरीता गोवरीचा पुरवठा करावा लागेल.**

३. निविदाधारकास निविदेसोबत **निविदा फी रक्कम रु. ३,३००/- (अक्षरी रुपये तीन हजार तीनशे मात्र) व बयाणा रक्कम रु. ५५,०००/- (अक्षरी रुपये पंचावन्न हजार मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन जमा करावयाची आहे याची नोंद घ्यावी.**

४. दुकान नोंदणी दाखला/स्थनिक स्वराज्य संस्थेचा दाखला/शासकीय उत्पादक परवाना अगर तत्सम शासकीय परवाना/आधारकार्ड/मतदानकार्ड, पॅनकार्ड, इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

५. शासन नियमानुसार वेळोवेळी लागु होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातुन कपात करण्यात येईल. शासनाने ०१ ऑक्टोबर २०१८ पासुन करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं. २०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्यानुसार संस्थानकडुन बीलातुन टॅक्स वसुल केला जातो. त्याचाही निविदाधारकांनी निविदा भरतांना विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६. निविदाधारकाने सदरचे दर हे शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार/मंदिर विभागात पोहोचचे सर्व समावेशक नमूद करावेत. कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

७. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत गोवरीचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा संस्थानकडे करावा लागेल. **सुरक्षा अनामत रक्कम गोवरीचा पुरवठा पुर्ण केल्यावर परत केली जाईल.** सुरक्षा अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

८. निविदा मंजूर झालेनंतर शिर्डी येथे येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकांस आदा करावी लागेल.

...२...

९. मागणीप्रमाणे गोवरीचा पुरवठा झाल्यास ती स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ती न नेल्यास, तिची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

१०. वरील ७ व ८ च्या अटीची पूर्तता केलेनंतर संस्थानकडून साहित्याचा पुरवठा आदेश दिला जाईल.

११. निविदाधारकाने पुरविलेली गोवरी संस्थानचे निविदेतील व पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे नसल्याने नाकारल्यास व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून गोवरीची खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर साहित्याच्या बिलातुन वसुल केली जाईल.

**१२. मागणी केलेली सर्व गोवरी वाळलेली पुरवावी लागेल. पुरवठा केलेली गोवरी संबंधीत विभागाने स्विकारलेनंतर त्यांचे अभिप्रायानुसार साधारण १ महिन्याचे आत बील आदा करणेचा प्रयत्न राहील. गोवरीच्या पुरवठ्याबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.**

१३. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. मंजुर झालेल्या दराने गोवरीचा पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही.

१५. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या परीमाणापेक्षा २५ % जादा गोवरीची मागणी संस्थानकडून झाल्यास सदर गोवरीचा पुरवठा मान्य दरानेच करावा लागेल.

१६. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ई-निविदा मुदत संपलेचे तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

१७. राज्याबाहेरील निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्रं.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकाच्या दरात ही गोवरी पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या गोवरीच्या ५०% गोवरीचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर ते तयार नसतील तर पुर्ण गोवरीचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

**१८. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

१९. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

...३...

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२०. गोवरी पुरविणेचा पुरवठा आदेश दिलेपासून १ वर्षाकरीता मागणीप्रमाणे गोवरीचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीची नसल्यामुळे ती नाकारली गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने गोवरी दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या गोवरीसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

२१. निविदेतील मंजुर दराने गोवरीचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

२२. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक गोवरीचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

२३. पुरवठा आदेशातील गोवरीचा मागणीप्रमाणे वेळेत पुरवठा केला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेले गोवरीची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रती आठवडा ००.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत दंड आकारण्यात येईल.

आ) पुरवठा न केलेले गोवरीची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रती आठवडा ००.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत पर्यंत दंड आकारण्यात येईल.

मात्र विलंबाने पुरवठा केलेली गोवरी स्विकारणेचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

२४. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द किंवा स्थगीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

( दी.म. मुगळीकर, भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ---------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ---------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ---------------------------------------------------------------

ऑफीस ---------------------------------------------------------------

दुकान ---------------------------------------------------------------

निवास ---------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ---------------------------------------------------------------

फॅक्स नंबर ---------------------------------------------------------------

ई – मेल ---------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ---------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ---------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ---------------------------------------------------------------

२. ---------------------------------------------------------------

६. बॅक खाते माहिती:- १. बॅक खातेदार नाव:- ---------------------------------------------------------------

२. शाखा:- ---------------------------------------------------------------

३. खाते नंबर व प्रकार:- ---------------------------------------------------------------

४. बॅक IFSC कोड:- ---------------------------------------------------------------

दिनांक - / /२०१९

ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)
अगर तत्सम शासकीय परवाना / **आधारकार्ड**/मतदानकार्ड

२. पॅन कार्ड

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– व्दारकामाईतील धुनीकरीता रानशेणी गोवरी पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत. नियमाप्रमाणे बयाणा रक्कम ऑनलाईन भरलेली आहे.

जितक्या गोवरीची निविदा मंजूर होईल, त्या मान्य दराने गोवरीचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर गोवरीच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख/DD/RTGS/NEFT द्वारे भरणा करु. अशी रक्कम मी भरणा न केल्यास, बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. संस्थानचे अटी-शर्तीप्रमाणे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व मंजूर दराने निविदा कालावधीत मागणीप्रमाणे गोवरी वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक -     /     /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

मंदिर विभागाचे व्दारकामाईतील धुणीसाठी खरेदी करावयाच्या गोवरीचा तपशिल

| अ.न. | तपशिल | मागणी | दर प्रती किलो (सर्व कर व खर्चासह) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | रानशेणी गोवरी (वाळलेली) | २,५०,००० किलो | | |

( दी.म.मुगळीकर,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी